**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**

---

**क्र. : मुमाआ/नों.क्र.५४२९/२१/त.क्र.३१/२४/०१**

**तक्रारदार श्री. इक्बाल आर. खान**
एकता नगर, ए/२५ रुम नं. १०, यशवंत नगर,
चव्हाण नगर, घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड,
मंडाला मानखुर्द (प.) मुंबई — ४०००४३.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते)) पू.उ. एम/प. विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका उप प्रमुख अभियंता (रस्ते)
पूर्व उपनगरे यांचे कार्यालय, पंतनगर गॅरेज इमारत, ४था मजला,
पंतनगर बस डेपोच्या मागे, घाटकोपर (पू.), मुंबई ४०००७५.
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते)पू.उ. एन, एम/पूर्व व एम/पश्चिम विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका उप प्रमुख अभियंता (रस्ते)
पूर्व उपनगरे यांचे कार्यालय, परिवहन यान गृह इमारत, ५ वा मजला,
पंतनगर बस डेपोच्या मागे, घाटकोपर (पू.), मुंबई ४०० ०७५.

| | |
|---|---|
| तक्रारीचा दिनांक | ०७.०५.२०२१ |
| सुनावणीचा दिनांक | ०१.०३.२०२४ |
| तक्रारदार | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | अनुपस्थित |

तक्रारदार यांनी दि. १४.०६.२०१९ रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपीलाबाबत अपील क्र.मुमाआ/नों.क्र.३१५९/१९/अ.क्र.३०२६/२०/०१ नुसार "एम/पश्चिम विभागातील वाशीगाव येथे चालू असलेल्या नाल्याचे बांधकाम मधील लागणारी निधीची" याबाबत कादगपत्रांची माहिती मागितलेली असून राज्य माहिती आयोगाने दि. २६.१०.२०२० रोजीच्या आदेशान्वये "अपीलाकर्ता यांचा मूळ माहिती अर्जाच्या तारखेच्या दिवशी जी माहिती उपलब्ध आहे आणि अपीलकर्ता यांना मिळाली नाही ती माहिती अपीलकर्ता यांना नि:शुल्क देण्यात यावी".

तथापि अद्याप माहिती मिळाली नसल्याने तक्रारदार यांनी दि. ०७.०५.२०२१ रोजी आयोगापुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे.

सुनावणीच्या वेळी तक्रारदार उपस्थित आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित आहे.

तक्रारदार यांनी असे विशद केले की, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते)) पू.उ. एम/प. विभाग यांनी आयोगाच्या आदेशाप्रमाणे उपलब्ध असलेली माहिती नि:शुल्क देण्यात यावी, असा आदेश पारित केले होते.

अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते)) पू.उ. एम/प. विभाग, श्री. प्रविण मोरे यांनी दि. २४.११.२०२० रोजी तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे :-

आदेश

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०१.०३.२०२४